विषय- कार्यालय प्रमुख व खातेप्रमुख यांनी
विनापरनगी मुख्यालय न सोडणेबाबत.

सातारा जिल्हा परिषद सातारा
सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.आस्था-2(3)/परिपत्रक/कावि/रमुको/2020
दि:-२८.08.2020

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सातारा जिल्ह्यामध्ये कोविड -19 (कोरोना) विषाणू संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमित होत आहेत. तसेच कार्यालयप्रमुख व खातेप्रमुख यांनी मुख्यालय न सोडण्याच्या सुचना आहेत.

माझ्या असे निदर्शनास आलेले आहे की, बरेच कार्यालय प्रमुख/खाते प्रमुख हे वरिष्ठांची पुर्वपरवानगी न घेता परस्पर रजेचा अर्ज देऊन रजेवर जातात व मुख्यालय सोडत आहेत, सदरची बाब प्रशासकीदृष्टया योग्य नाही.

सबब या परिपत्रकाव्दारे सर्व कार्यालय प्रमुख /खातेप्रमुख यांना कळविण्यात येते की, सर्व संबंधित कार्यालय प्रमुख/खातेप्रमुख यांनी वरिष्ठांची समक्ष पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारच्या रजेवर जाता येणार नाही अगर मुख्यालय सोडता येणार नाही, वरिष्ठांची पूर्वपरवानगीशिवाय कोणीही रजेवर अगर मुख्यालय सोडल्याची बाब निदर्शनास आल्यास सदर दिवसाची विनावेतन करून शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा

प्रति

1. सर्व खाते प्रमुख
   जिल्हा परिषद सातारा -------------------------

2. गट विकास अधिकारी
   पंचायत समिती सर्व------------------------------

3. सर्व संबधित कार्यालय प्रमुख सर्व----------------

१) श्री. नरराज पाटील यांना संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी
२) आस्थापना - २(3) यांचे आदेश नस्तीस.

Scanned with CamScanner